दि. ५.११.९५ → महाराष्ट्र टाईम्स

# मुंबापुरी ! तू माझी निराशा केलीस...



चित्र : चंद्रकांत गणाचार्य

प्रिय मुंबापुरी,

२४ ऑक्टोबरचे खग्रास सूर्यग्रहण अलाहाबादजवळ इरादत गंज येथे पाहून मी परतलो, आणि २५ तारखेची वृत्तपत्रे मोठ्या अपेक्षेने उघडली. कशासाठी ? ग्रहणाची उत्कृष्ट छायाचित्रे मला पहायची नव्हती.... प्रत्यक्ष दर्शनाचा आनंद लुटल्यावर छायाचित्रांचे आकर्षण कितीसे असणार ? मला जाणायची उत्सुकता होती की, त्या प्रसंगी तू कशी वागलीस ? भारताच्या सर्वात प्रगत समजल्या जाणाऱ्या महानगरीने सूर्यग्रहणाचे स्वागत कसे केले ? अनेक वर्षांनी दिसणारा हा नैसर्गिक 'खेळ सावल्यांचा' पहायला मुंबईने रस्त्यांवर, घरांच्या गॅलऱ्यांत, चौपाटीच्या मैदानात गर्दी केली का ?

छे ! मुंबापुरी, तू माझी पूर्ण निराशा केलीस. जणू काय 'बंद' चालू आहे, अथवा अतिरेक्यांचे बॉम्बहल्ले चालू आहेत, अशी तू शहामृगासारखी मान खुपसून राहिलीस. चुकलो ! बंद असला तरी मुंबईकर खिडक्या-दारे बंद करून, पडदे ओढून स्वतःला कोंडून घेत नाहीत. २४ तारखेला मुंबईत ही दृश्ये पण दिसली.

१९८० च्या ग्रहणाच्या वेळी तू अशीच वागलीस. रस्ते ओस, बसगाड्या सुस्त आणि माणसे 'हाऊस अरेस्ट'मध्ये. प्रगत जगात त्या वेळी तुझे हसे झाले होते.

तो अनुभव आठवत होता म्हणून यंदा शास्त्रज्ञांनी, वैज्ञानिक संस्थांनी, स्वयंसेवी संघटनांनी, हौशी खगोल निरीक्षकांनी जनजागरणाच्या मोहिमा आखल्या. 'घराबाहेर पडा आणि हा दुर्मीळ अनुभव चुकवू नका — योग्य दक्षता घेऊन ग्रहण पाहता येते — पिन-होल कॅमेरा घरी बनवून ग्रहण पाहू शकता — नाहीतर मोठ्या झाडाखाली चंद्राकार कवडसे पहा' — आणखी पुष्कळ सांगून पाहिले. व्याख्यानांतून, वृत्तपत्रांतून, दूरदर्शनवरून, रेडिओवरून. पण ते पालथ्या घड्यावर पाणीच होते.

तू म्हणशील, ''मलाच का दोष देता ? राजधानी दिल्लीने काय वेगळे केले ? विद्येचे माहेरघर पुणे आणि स्वतःला 'सायन्स सिटी'च किताब देणारे बंगलोर इथेही शुकशुकाट नव्हता का ? आणि तुम्ही गेलात त्या अलाहाबादेत पण सुनसान होते.''

मान्य आहे; पण मुंबापुरी तुझ्याकडून वेगळेपणाचीच अपेक्षा होती. नव्या विचारांची दिशा दाखवण्याची तुझी परंपरा आहे. परदेशी जाणे म्हणजे पापकर्म, अशी रूढी असताना तू उत्कृष्ट बंदर बांधून जगाशी व्यापार सुरू केलास. पुणे जेवणावळीत आणि कर्मकांडात गुंतले असताना तू नवे विद्यापीठ बांधलेस. ज्या विज्ञान-तंत्रज्ञानाचे महत्त्व भारतातील राजे - नबाबांनी ओळखले नाही, त्यासाठी तू इथे सुविधा पुरवल्यास. सर्व धर्म - जाति - प्रांत समभाव तू प्रथम आचरणात आणलास.

अशा तुझ्या परंपरा विसरून आता [एकवि]सावे शतक समोर उभे ठाकले असताना तू परत फिरून एकोणिसाव्या शतकाकडे का गेलीस ?

का हा आधुनिकतेचा तुझा मुलामा वरवरचा आहे ? मला तरी अशी दाट शंका येते आहे. तू म्हणशील, 'रस्ते ओस पडले, दुकाने बंद होती; कारण लोक दूरदर्शनवर ग्रहणाचा कार्यक्रम पहात होते.'' असे म्हणणे म्हणजे आत्मवंचनाच. आकाशात प्रत्यक्ष नाट्य घडत असताना लोक दोन तास टीव्ही समोर खिळून बसतील हे खरे वाटत नाही. तुला दिसणारे खंडग्रास ग्रहण त्याच वेळी पडद्यावर दिसत होते. अपवाद होता तीन-चार मिनिटांचा जेव्हा नीम का थाना ते डायमंड हार्बर खग्रास ग्रहण दूरदर्शनने दाखवले.

दुसरी सबब तू सांगशील : ''ग्रहण डोळ्यांनी पाहू नये म्हणून लोक घरात राहिले.'' हा आत्मवंचनेचा दुसरा प्रकार. तूच सांग, सामान्यपणे कुठल्याही दिवशी आपण सूर्याकडे किती वेळा पाहतो ? जर ग्रहणाचे खास चष्मे नसतील, तर उघड्या डोळ्यांनी सूर्याकडे पाहू नये हे खरे. पण न पाहता आपला दिनक्रम नेहमीप्रमाणे चालू ठेवणे मुळीच अवघड नव्हते.

मी सांगू ? लोक मुळी बाहेर पडायलाच भीत होते. ग्रहणकाळात वातावरण दूषित असते, हा शतकानुशतके मानगुटीवर बसलेला बागुलबुवा मुंबईकर अजून खरा मानतात. दुबळ्या सबबी सांगण्याऐवजी तू जर स्पष्ट म्हणाली असतीस, ''गर्व से कहो, हम अंधश्रद्ध है.'' तर मला तुझ्याबद्दल थोडी तरी सहानुभूती वाटली असती. दुग्धप्राशनाच्या तथाकथित चमत्कारासाठी तासन् तास रांग लावणारा मुंबईकर ग्रहणाच्या खऱ्याखुऱ्या नैसर्गिक चमत्कारापासून का तोंड फिरवतो हे मग सहज पटले असते.

काही असो. तू २४ ऑक्टोबर रोजी अशी वागलीस, हा विज्ञानाचा संदेश पसरवू पाहणाऱ्या आम्हा सर्वांचा पराभव आहे. टाटा मूलभूत संशोधन संस्था, टाटा समाजविज्ञान संस्था, अणुशक्ती केंद्र, दोन मोठी विद्यापीठे, नेहरू तारांगण, मराठी विज्ञान परिषद, हौशी खगोल निरीक्षकांच्या संघटना... इतके सगळे तुझ्यापाशी असूनही तुझे पाऊल अजून आजच्या विज्ञानयुगात पडायला धजत नाही. हा दैवदुर्विलास आहे...

१९८० आणि १९९५ चे असे अनुभव आल्यावर आम्ही हताश होऊन आमचे प्रयत्न सोडून द्यावेत का ? नाही... अजून आशेचा किरण आहे. २४ तारखेला रस्ते ओस होते तरी नेहरू तारांगणात गर्दी होती — ग्रहण पाहणाऱ्यांची. म्हणून आम्ही पुन्हा तुझे मन वळवायचा प्रयत्न करू. तसा मौका चार वर्षांतच मिळेल. ११ ऑगस्ट १९९९ ला पुन्हा खग्रास सूर्यग्रहण आहे. तेव्हा एकविसावे शतक केवळ ५०९ दिवसांवर येऊन ठेपले असेल, त्यासाठी तुला जागे केलेच पाहिजे.

तुझा एकेकाळचा नागरिक,

**— जयंत नारळीकर**